आरएनआय रजि नं. MAHMAR/2011/40781 पोष्ट परवाना No.G/NMD/128/2012-14

# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष ४ थे. अंक १०वा. नवी मुंबई दिनांक १ ते ३१ मे २०१५ पाने ८ किंमत २० रूपये

## कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा २००५






**समजून घ्या आपले अधिकार**
**थांबवा कौटुंबिक हिंसाचार**



**जेथे ' छळ ' ली जाते बाई**
**ते कुटुंब अधोगतीला जाई !**

माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

मासिक **नागरिक अधिकार**

**सुभाष बसवेकर**
● संपादक ●
**गणेश काजळे-पाटील**
●कार्यकारी संपादक●

संपादक मंडळ /प्रतिनिधी

रामशंकर सरोज (मुंबई)
गौतम गायकवाड (नवी मुंबई)
राजेश म.बने (रायगड)
देविदास चौथमल (औरंगाबाद)
भगवान वाहूळे (पूणे)
हरिभाऊ माटेटवार (नागपूर)
सुशांत चोणकर (सिंधूदुर्ग)
अभिजित पटवा (कोल्हापूर)
प्रीतम यादव (सातारा)
संभाजी सावंत (सांगली)
इब्राहिम पठाण (औरंगाबाद)
मोतीराम काळे (नांदेड)
स.अहमद स.अली अन्सारी(परभणी)

अंक दर महिन्याच्या दहा तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : **नागरिक अधिकार**
प्लॉट नं. डी-२२ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E- mail :
mediamansubhash@gmail.com
: web site :
rtimahasangh.weebly.com

## संपादकीय...........

# जेथे ' छळ ' ली जाते बाई ते कुटुंब अधोगतीला जाई !

आपल्या देशात स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचारांच्या व कौटुंबिक हिंसाचारा च्या घटनांची आकडेवारी पाहिली तर देशात एक वर्षात अशी लाखो नोंदवलेली दिसतील. याचाच अर्थ असा आहे की आम्ही स्त्री-पुरूष मुक्तीच्या स्वप्नांपासून अजून कोसो दुर आहोत.स्त्री मुक्ती आंदोलनांनी स्त्रीयांमध्ये आत्मभान जागे होऊ लागले असले तरी आणि काही पुरुष त्यास मान्यता देऊ लागले असले तरी ही संख्या परिवर्तनाचा रेटा निर्माण होईल इतकी पुरेसी नाही आहे.स्त्री मुक्तीचा प्रश्न हा फक्त स्त्रियांचा नाही आहे तर त्यात पिडीत जरी स्त्री असली तरी पिडणारा म्हणून पुरुष हा कोणत्याना कोणत्या नात्यने गुंतलेला असतोच. म्हणून स्त्री -पुरुष मुक्तीचा नवा आशाय असणारी व स्त्री वरील होणाऱ्या अत्याचारात पुरुष म्हणून पुरुषाची भागीदारी कमी कशी होत जाईल या पुरुषामध्येही चर्चा झाली पाहिजे.स्त्री ला छळणारी व्यक्ती ही समाज निदंची धनी झाली पाहिजे.असा समाज निर्माण होणे गरजेचे आहे.

ज्या घरात स्त्री चा छळ झाला आहे त्या घराने नेहमीच अधोगतीचे तोंड पाहिलेले आहे.कौटुंबिक हिसांचाराच्या प्रत्येक प्रकरणात पहिला बळी जरी स्त्रीचा जात असला तरी अशा कुटुंबातील मलांच्या मानसिक स्थितीवर त्याचा गंभीर परिणाम होत असतो.मुलांच्या वाढीवर व विकासावरही त्याचे परिणाम होत असतात.परिणमत: कौटुंबिक हिंसाचारात सगळेच कुटुंब वाताहातीच्या गर्तेत ढकलले जाते.

सामाजिक कार्यकर्त्यांनी कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा २००५ हा समजून घेऊन अशा प्रकरणता बळी पडलेल्या पिडीतांच्या मदतीला धावून जाण्याची गरज असून पिडीताना कायद्यानुसार योग्य सरंक्षण मिळवून दिल्यास समजात एक सकारात्मक संदेश जाईल.

# कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा २००५

सामाजिक विकासात महिलांचा सहभाग हा मुद्दा नेहमीच महत्वाचा मानला गेला आहे. तथापी या महत्वाच्या घटकाकडे ायोग्य,अलिप्त किंवा तिरस्कारयुक्त भावनेने पाहणे,अन्याय करणे,अपमानीत करणे व वंचीत ठेवणे या गोष्टी पावलोपावली आढळून येतात महिलांना सर्वात जास्त त्रास घरातल्या घरात पतीकडून किंवा त्याच्या किंवा तिच्याही नातेवाईकाकडून होतो व त्यासाठी दाद मागणे जवळजवळ अशक्य असते. यातून मार्ग शोधण्याचा प्रयत्न म्हणून सदरचा अधिनियम अस्तित्वात आला.

सदर कायदा केंद्र शासानाच्या दि.१७.१०.२००६ च्या अधिसूचनेद्वारे दि. २६.१०.२००६ पासून देशभरात अंमलात आणला आहे.

कौटुंबिक हिंसाचार हा मानवी हक्क विषयक प्रश्न असून ता विकासाच्या मार्गातील अडसर आहे ही बाब लक्षात आल्याने त्यापासून महिलांचे संरक्षण करणे हा प्रमुख उद्देश यामागे आहे.

कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना सार्वत्रिक असल्या तरी या अदृष्यच राहतात. सद्या महिलेवर स्वकियांनी अत्याचार केल्यास भागातील दंडसंहितेच्या कलम ४९८ अ नुसार तो अपराध ठरतो. मात्र दिवाणी कायदे या घटनांवर सखोल चर्चा करीत नाहीत. म्हणून दिवाणी कायद्यांन्वये कौटूंबिक हिंसाचारास प्रतिबंध घालण्याचा उद्देश यामागे आहे.

महिलेचा छळ करणारी व्यक्ति एकाच घरात राहात असेल,त्यांच्यात रक्ताचे,विवाहातील नात्याचे,दत्तक विधानाने आलेले संबंध असतील किंवा याशिवाय एकत्र कुटूंबातून निर्माण होणारे नातेसंबंध असतील तर,त्यांच्या अंतर्भाव या कायद्याच्या कक्षेत येतो.

## कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय ?

कलम ३ अंतर्गत कौटुंबिक छळ म्हणजे शारिरीक,शाब्दिक,लैंगिक,मानसिक किंवा आर्थिक छळ,हुंड,किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमानित करणे,तिला शिवीगाळ करणे,विशेषत : अपत्य नसल्यासमुळे तिला हिणवणे,किंवा धमकावणे या सर्व कृती कौटुंबिक छळ समजण्यात येतील आर्थिक छळ म्हणजे महिलेचे स्वत:चे उत्पन्न,स्त्रीधन, मालमत्ता किंवा इतर आर्थिक व्यवहास किंवा तिच्या हक्काच्या

इतर कोणत्याही मालमत्तेपासून तिला वंचित करणे,कौटुंबिक मिळकतीतील तिचा हिस्सा तिला न देणे,हा आर्थिक छळाचा भाग असेल. तसेच घरात राहण्याच्या हक्कापासून तिला वंचित करणे,घराबाहेर काढणे हाही आर्थिक छळाचा भाग राहिल.

## संरक्षण अधिकरी,सेवा पुरविणारे यांना माहिती पुरविणे

कलम ४ अन्वये कोणतीही व्यक्ती ज्याला कौटुंबिक छळाबद्दल माहिती असल्यास तो त्याबाबत संरक्षण अधिकाऱ्याला,सेवा पुरविणाऱ्यांना कळवू शकतो तसेच या कायद्याखाली कोणतीही पीडित महिला स्वत:सरळ पोलिस स्टेशनमध्ये / दंडाधिकाऱ्याकडेही तोंडी किंवा लेखी तक्रार दाखल करू शकते.

कलम ५ अन्वये पोलिस अधिकरी,संरक्षण अधिकरी,(सेवक) सर्व्हिस प्रोव्हायडर किंवा एखादा दंडाधिकरी यापैकी कोणीही एखादे कौटुंबिक छळाचे प्रकरण त्यांच्या नजरेस आणल्या पुढील कारवाई करू शकतो

त्यांनी महिलेला तिच्या हक्कांबद्दल त्वरित माहिती द्यावी व तिला खालील आदेश मिळविणे कमी अर्ज करणेच्या हक्कची/पद्धतीची माहिती देतील. तिला पुढिल प्रकारचे संरक्षण किंवा इतर मदत मिळू शकते.उदा. आर्थिक मदत,अपत्याच्या ताब्याचे आदेश,घरात राहण्याचा हक्क असल्याचे आदेश,तिला नुकसान भरपाईचे आदेश प्राप्त होऊ शकतात.

तिला संरक्षण अधिकरी व सेवकांची सेवा मिळविण्याचे अधिकार आहेत व विशेषत:मोफत कायदेशीर सल्ला मिळण्याचे अधिकार आहेत. शिवाय भारतीय दंडविधान संहितेच्या कलम ४९८ (अ) अन्वये स्वतंत्रपणे तक्रार करण्याचा हक्क आहे.या सर्व हक्कांबद्दल महिलेला त्वरित माहिती देणे संबंधित अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे.

कलम ६ अन्वये पीडित महिलेला आधारगृहामध्ये तातडीचा आश्रय घेण्याची गरज असल्यास तिला आधारगृहात आश्रय दिला

जाईल. यासाठी संरक्षण अधिकाऱ्याने किंवा सेवा पुरविणाऱ्या संस्थेने पिडीत महिलेला आश्रय गृहामध्ये आसरा देण्याची कार्यवाही करावी नियम ११(१) अन्वये आश्रयगृहे चालविणेसाठी संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था किंवा कंपनी अधिनियम १९५६ नुसार इतर कोणत्याही कायद्यान्वये नोंदणी केलेली संस्था राज्य शासनाकडे नियमातील नमुना ६ नुसार अर्ज करेल व राज्य शासन नियम ११(२) नुसार आवश्यक ती चौकशी केल्यानंतर नोंदणी प्रमाणपत्र देईल

शासन निर्णय -दि.२१.१२.२००६ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व राज्य गृहे, आधारगृहे,स्वाधारगृहे व अल्पमुदती निवासगृहे आश्रयगृहे म्हणून घोषीत करण्यात आलेले आहेत.

## वैद्यकीय सुविधा

कलम ७ अन्वेय पीडित व्यक्ति किंवा तिच्यावतीने संरक्षण अधिकारी,सेवा पुरविणारे हे वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या संस्थेला पीडित व्यक्तिला सेवा पुरविण्याची विनंती करतील. त्यानुसार तात्काळ सेवा पुरविल्या जातील.

## संरक्षण अधिकाऱ्याची कर्तव्ये व कार्ये

कलम ९ अन्वेय संरक्षण अधिकाऱ्यांची कर्तव्य व कार्य पुढीलप्रमाणे आहेत.

दंडाधिकाऱ्यांना या अधिनियमाखाली कार्ये पार पाडण्यास मदत करणे. तक्रार प्राप्त झाल्यावर विहित नमुन्यातील (नमुना १) घटना अहवाल दंडाधिकाऱ्याकडे सादर करणे व त्या कार्यक्षेत्रातील पोलीस ठाण्याच्या
अधिकाऱ्याला व सेवा पुरविणाऱ्यांना त्यांची प्रत देणे.

पीडित व्यक्तिच्या इच्छेनुसार संरक्षण आदेश मिळविण्यासाठी नमुना २ मध्ये दंडाधिकाऱ्यांकडे अर्ज करणे पीडित व्यक्तिच्या विधी सेवा प्राधीकरणाची मदत मिळवून देणे. कार्यक्षेत्रातील विधीसहाय्य,समुपदेशन,आश्रयगृहे,वैद्यकीय सुविधा पुरविणाऱ्यांची यादी ठेवणे. पीडित व्यक्तिला आश्रयाची गरज भासल्यास सुरक्षित आश्रयगृह उपलब्ध करून देवून अहवालाची प्रत त्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशन आणि दंडाधिकाऱ्यांना देईल. पीडित व्यक्तिला शारिरीक जखमा झालेल्या असल्यास तिची वैद्यकीय तपासणी करून,त्या अहवालाची प्रत कौटुंबिक हिंसाचार ज्या क्षेत्रात घडला असेल तेथील पोलीस स्टेशनला व दंडाधिकाऱ्यांना पाठविणे.

## कलम २० नुसार अर्थिक अनुतोषाच्या ओदेशाचे अनुपालन व अंमलबजावणीची खात्री करणे.

संरक्षण अधिकरी दंडाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली आणि पर्यवेक्षणाखाली व दंडाधिकाऱ्यांनी तसेच शासानाने ठरविलेल्या जबाबदारीचे पालन करील.

## नियम १० नुसार संरक्षण अधिकाऱ्याची इतर कर्तव्ये

पीडित व्यक्तिला एकतर्फी अंतरीम सहाय्य देणेबाबत न्यायालयाला स्पष्टीकरण आवश्यक असल्यास,प्रारंभिक चौकशी करण्यासाठी विभागून राहत असलेल्या जागी भेट देणे व गृहभेटीचे आदेश काढणे.चौकशी अंती न्यायालयाने आदेश दिल्याप्रमाणे वित्तलब्धी,मालमत्ता,बँक खाती व इतर दस्तऐवज याबाबत अहवाल सादर करणे.पीडित व्यक्तीच्या व्यक्तिगत वस्तू,भेटवस्तू,दागिने व ती विभागून राहात असलेले घर यांचा ताबा परत मिळविणे. मुलांचा ताबा मिळविणे व न्यायालयाच्या निर्देशानुसार मुलांची भेट घेण्याचे हक्क मिळविणे. नमुना ४ मध्ये दर्शविलेल्या हक्कांसंबंधीची माहिती पीडित व्यक्तिला देवून त्यानुसार कार्यवाही करणे नमुना ५ नुसार सुरक्षा योजना दर्शविली असून त्यानुसार संरक्षण अधिकरी,पोलीस अधिकारी व सेवा पुरविणारा या नमुन्यातील तपशील देण्यासाठी पीडित महिलेला मदत करील.

## सुंरक्षण अधिकाऱ्यास शिक्षेची तरतुद

कलम ३३ नुसार संरक्षण अधिकाऱ्याने त्यांची कर्तव्ये बजावण्यात कसुर केल्यास किंवा दंडाधिकाऱ्याने पारीत केलेले संरक्षण आदेशाची पर्याप्त कारणाशिवाय अंमलबजावणी करण्याचे नाकारल्यास त्यास १ वर्षापर्यंतच्या तुरूंगवासाची किंवा रू. २००००/- पर्यंतच्या दंडाची किंवा दोन्हीही शिक्षा होतील.कलम ३४ नुसार संरक्षण अधिकाऱ्याविरूद्ध राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणताही खटला करता येणार नाही. कलम ३५ संरक्षण अधिकाऱ्याने सद्भावनेच्या दृष्टीने कोणतीही कृती केल्यास या कायद्यानुसार कोणत्याही कायदेशीर कारवाईस तोपात्र ठरणार नाही.

दंडाधिकाऱ्याने निर्देश दिले असतील त्यारितीने या अधिनियमाखालील कार्यवाहीतील कलम १२,१९,२०,२३ अन्वेय आदेशांची

अंमलबजावणी करण्यास न्यायालयास मदत करणे. राज्यशासनाकडून व दंडाधिकाऱ्यांकडून अधिनियम व नियमांच्या तरतुदी अंमलात आणणेसाठी नेमून दिलेल्या कर्तव्यांचे सुद्धा पालन करील.

आपल्या अखत्यारीतील प्रकरणे प्रभावीरित्या हाताळणेसाठी दंडाधिकारी संरक्षण अधिकाऱ्यांना सर्वसाधारण प्रथांविषयी निर्देश देवू शकेल व त्याचे पालन करणे संरक्षण अधिकाऱ्यांना बंधनकारक असेल.

## सेवा पुरविणारे

कलम १० अन्वये कोणतीही स्वयंसेवी संस्था जी संस्था किंवा कंपनी म्हणून नोंदणीकृत आहे किंवा इतर कोणत्याही कायद्याखाली महिलांच्या संरक्षणासाठी काम करत आहेत,अशी संस्था राज्य शासनाकडे सेवा पुरविणारे म्हणून नोंदणी होण्यासाठी नमुना ६ मध्ये अर्ज दाखल करू शकते.

## अशा सेवकांना खालील अधिकार व कर्तव्ये राहतील:-

कौटुंबिक छळाच्या घटनांचा अहवाल तयार करणे व त्याच्या प्रति दंडाधिकारी व संरक्षण अधिकारी यांना पाठविणे महिलांची वैद्यकिय तपासणी करून घेणे व त्याचा अहवाल संरक्षण अधिकारी व पोलिस स्टेशनला पाठविणे. महिलेला आधारगृहात आश्रय मिळवून देणे.सेवा पुरविणाऱ्यांनी या अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी केलेली कृती ही सद्हेतुने केलेली गृहीत धरण्यात येवून त्याच्याविरूद्ध कोणताही दावा/खटला किंवा इतर कोणतीही कारवाई होवू शकणार नाही. **सेवा पुरविणारे** कलम १२ अन्वेय पीडित महिलेला संरक्षण अधिकाऱ्यामार्फत,स्वत: किंवा तिच्या वतीने कोणत्याही व्यक्तीला दंडाधिकाऱ्याकडे नमुना २ नुसार अर्ज करून मदत मागता येईल.त्यानुसार -अर्ज मिळाल्यापासून ३ दिवसाच्या आत दंडाधिकारी पहिल्या सुनावणीची तारीख निश्चित करेल.पहिल्या सुनावणीपासून ६० दिवसाच्या आत दंडाधिकारी सदर प्रकरणात अंतिम कारवाई करण्याचा प्रयत्न करील.कलम १३ नुसार नमुना ७ प्रमाणे दंडाधिकाऱ्यांनी दिलेली नोटीस बजावण्याची जबाबदारी संरक्षण अधिकाऱ्याची राहिल.

नियम १२(२) अन्वये अधिनियमाखालील कार्यवाहीच्या नोटीसा संरक्षण अधिकाऱ्याकडून / त्याने नोटीस बजावणीचे निर्देश दिले असतील अशा अधिकाऱ्याकडून प्रतिवादी जेथे राहतो त्या पत्तावर बजावण्यात येतील.

## समुपदेशन

कलम १४ अन्वेय दंडाधिकाऱ्याला या अधिनियमाखालील कार्यवाहीच्या कोणत्याही टप्पात प्रतिवादीला किंवा पीडित व्यक्तीला एकटद्याने अथवा संयुक्तपणे सेवा पुरविणाऱ्या अनुभवी व्यक्तीकडून समुपदेशन घेण्याचे निर्देश देता येतील.

नियम १२ नुसार उपलब्ध समुपदेशींच्या संरक्षण अधिकाऱ्याने पाठविलेल्या यादीमधून बाधीत व्यक्तीच्या सुचनेनुसार समुपदेशींची नियुक्ती करण्यात येईल.नियम १४ नुसार समुपदेशीने अनुसरावयाची कार्यपद्धती स्पष्ट करण्यात आली असून त्याने न्यायालन व संरक्षण अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणखाली कार्यवाही करावी.

## संरक्षण आदेश

कलम १८ अन्वेय दंडाधिकारी महिलेला खालील प्रकारचे ओदश काढू शकतात.

छळापासून संरक्षणाचे आदेश, म्हणजे प्रतिवादीला कोणत्याही प्रकारचा छळ करण्यास प्रतिबंध करणे.छळ स्वत : न करता इतर व्यक्तींकडून करवून घेण्यास प्रतिबंध करणे.महिलेच्या कामाच्या ठिकाणी किंवा इतर ठिकाणी जाण्यास प्रतिबंध करणे.

महिलेशी कोणत्याही प्रकारचा संपर्क करण्यास प्रतिबंध करणे,तो संपर्क लेखी असो, तोंडी असो किंवा दूरध्वनीमार्फत किंवा ई-मेल द्वारा इ. कोणत्याही प्रकारचा असो.महिलेकडून कोणतीही मालमत्ता काढून घणे, कोणत्याही प्रकारचे संयुक्त लॉकर्स, संयुक्त बँकखाते हाताळण्यास प्रतिबंध करणे. स्त्रीधन तिच्यापासून हिरावून घणे. महिलेला मदत करणाऱ्या इतर कोणत्याही कुटुंबाच्या सदस्यांना किंवा तिच्या नातेवाईकांना धमकावणे किंवा इतर तऱ्हेने हानी पोहचवण्यास प्रतिबंध करणे इ.

## प्रतिवादीने संरक्षण आदेशाचा भंग केल्यास शिक्षा

कलम ३१ अन्वेय संरक्षण आदेशाचा प्रतिवादीने भंग केल्यास तो १ वर्षपर्यंत मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा रु.२०,००० /- पर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा दोनही शिक्षा होण्यास पात्र असेल.

कलम ३२ नुसार दखल आणि पुरावा नमुद केला आहे, त्यानुसार

(१) फौजदारी प्रक्रिया संहिता यामध्ये काहीही अंतर्भुत असेल तरी कलम ३१ नुसारचा अपराध हा दाखलपात्र व विना जामिन असेल. (२) पीडित व्यक्तीच्या तोंडी साक्षीवरून कलम ३१ नुसारचा अपराध आरोपीने केला आहे निष्कर्ष न्यायालयाला काढता येईल.

## निवास आदेश

कलम १९ अन्वेय दंडाधिकारी खालील प्रकारचे आदेश काढू शकतात : -

प्रतिवादीला महिलेला घरातून हाकलण्यापासून प्रतिबंध करणे.घराच्या ज्या खोलीत पिडीत महिला राहते त्या खोलीत प्रतिवादी किंवा त्यांच्या नातेवाईकांना जाण्यास प्रतिबंध करणे, घर विकण्यापासून किंवा गहाण ठेवण्यापासून प्रतिवादाला प्रतिबंध करणे. गरज असल्यास महिलेसाठी पर्यायी घराची व्यवस्था करणे,किंवा पर्यायी घरासाठी भाडे देण्याचे आदेश प्रतिवादीला देणे. या शिवाय कोणतेही इतर आवश्यक आदेश दंडाधिकारी देऊ शकतात. उदा. हमीपत्र लिहून घणे, पोलिस स्टेशनला महिलेला संरक्षण देण्याचे आदेश काढणे, जप्त केलेले स्त्रीधन परत करण्याचे आदेश प्रतिवादीला देणे इ.

## आर्थिक सहाय्य

कलम २० अन्वये दंडाधिकारी पीडित व्यक्तीला, तिच्या कोणत्याही मुलाला कौटुंबिक हिंसाचारामुळे करावा लागलेला खर्च/सोसाव्या लागलेल्या हानीच्या भरपाईसाठी प्रतिवादीला आर्थिक सहाय्य देण्याचे ओदश काढू शकतात. जसे :- मिळकतीची हानी. वैद्यकिय खर्च पीडित व्यक्तीच्या मालमत्तेचा नाश,तिला हानी पोहोचविणे,तिच्या नियंत्रणातून काढून घणे यामुळे झालेली हानी. पीडित व्यक्ती व तिच्या मुलांचा निर्वाह खर्च इ. व या व्यतिरिक्त अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायदयाखालील आदेश.

## ताबा/भरपाईचे आदेश

कलम २१ अन्वेय या कायदयानुसार सुरू असलेल्या सुनावणीच्या कोणत्याही टप्प्यावर पीडित व्यक्तीला तिच्या मुलांचा तात्पुरता ताबा देणेबाबतचे आदेश दंडाधिकाऱ्यांना करता येतील, परंतु प्रतिवादीच्या भेटीमुळे मुलाच्या हिताला बाधा आहे असे दंडाधिकाऱ्यांचे मत झाल्यास ते त्याला भेटीची परवानगी नाकारू शकतात.

कलम २२ अन्वेय अधिनियमान्वये देण्यात येतील अशा इतर सहाय्यां व्यतिरिक्त बाधीत व्यक्तीच्या अर्जावर,उत्तरवादीने केलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या कृतीमुळे बाधीत व्यक्तीला झालेल्या इजा, मानसिक छळ आणि भावनिक क्लेष यासाठी भरपाई आणि नुकसान भरपाई देण्याचे निर्देश उत्तर वादीला देणारे आदेश दंडाधिकारी काढू शकतील.

कलम २३ अन्वेय या अधिनियमाखालील कोणतीही कार्यवाही दंडाधिकाऱ्यांकडे प्रलंबीत असताना त्याला न्याय आणि योग्य वाटतील असे अंतरीम आदेश त्यास काढता यतील.मात्र यासाठी पीडीत व्यक्तीने नमुना ३ नुसार शपथपत्र न्यायालयात सादर करावे.

कलम २४ नुसार न्यायालयाने या अधिनियमान्वये जे कोणते आदेश काढले असतील त्याच्या प्रति सर्व पक्षकारांना,पोलिस अधिकाऱ्यांना, सेवा पुरविणाऱ्यांना, घटनेची नोंद करणाऱ्यांना मोफत पुरविल्या जातील.

कलम २५ नुसार बाधित व्यक्ती आपला अर्ज मागे घेईपर्यंत कलम १८ अन्वयेचे संरक्षण आदेश अंमलात राहतील.

कलम २६ नुसार इतर दावे आणि कायदेशीर कार्यवाही त्यामधील सहाय्य घणेसंदर्भात स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

कलम २९ नुसार दंडाधिकाऱ्याने काढलेला आदेश पीडित व्यक्तीवर, प्रतिवादीवर बजावण्यात आलेल्या तारखेपैकी जी नंतरची असेल त्या तारखेपासून ३० दिवसात सत्र न्यायालयाकडे अपिल करात येईल.

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.डी-२२, सेक्टर- १२ खारघर, नवी मुंबई-४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : ----------------------------------------------------

पत्ता :----------------------------------------------------

-------------------------------- पीनकोड

मोबाईल :

ई मेल :---------------------

शिक्षण : ----------------------- जन्मदिनांक ------------------------------

व्यवसाय :--------------------- येणाऱ्या भाषा: ------------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे: ---------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : ---------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /------------------------------------

मी प्रतिज्ञापूर्वक आणि विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी ओळखपत्र खर्च २०० रूपये पोष्टेज खर्च १०० रूपये आणि २०० रूपयांची तीन पुस्तक व स्थानिक शाखा शुल्क १०० रूपये असे एकत्रीत ६०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व नागरिक अधिकार विषयक पुस्तके मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावीत.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीनृ तसेच माहिती अधिकार महासंघाच्या कार्यकर्ता आचारसंहितेचे काटेकोर पालन करीन.कोणतेही बेकायदेशीर कृत्य करणार नाही.

आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : -------------

सही

सभासद कोड नंबर

### कार्यालयीन उपयोगासाठी

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक / / २०१५ मुदत समाप्तीचा दिनांक / / २०१६
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद ------------------------------ आयडी पाठविलाचा दिनांक /पोस्ट / कुरिअर
- सभासद प्रक्रिया शुल्क मनिऑर्डर / बँक अकाऊंट / डी.डी./चेक ने दि. / / २०१ रोजी जमा झाली

आपण वेबसाईट rtimahasangh.weebly.com वरूनही ऑनलाईन फार्म भरू शकता

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार जागरूक नागरिक यांच्याकडून - शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्देसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ** प्लॉट नं.डी-२२, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१० या पत्यावर पाठवावा. ओळखपत्र खर्च / पोष्टेज व नागरिक अधिकार प्रकाशनांची तीन पुस्तके असे एकत्रीत मुल्य ६०० रूपये स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून खाते नंबर **32619447406** स्वराज बहुउद्देशिय संस्था,खारघर नवी मुंबई या नावाने भरावेत..बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर सभासद ओळखपत्र व पुस्तके पाठवली जातील.सभासदांना महासंघाच्या वेबसाईडवरून **web site : rtimahasangh.weebly.com** ऑनलाईन फार्म भरता येईल.या अंकात पान ७ वर दिलेला सभासद फॉर्म झेरॉक्स करून सविस्तर भरून फोटो चिकटवून तो सायबर कॅफेमधून स्कॅन करूनही **mediamansubhash@gmail.com** या ई मेलवरूनही पाठविल्यास अधिक सोईचे होईल.तरी जास्तीत जास्त माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी सभासद व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

पोष्ट परवाना. No.G/NMD/128/2012-14

प्रति,

पाठविणार
पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-९६, सेक्टर -१२ खारघर
नवी मुंबई ४१०२१०
महाराष्ट्र
मो ९२२३५१६९२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले. रजि नं. MAHMAR/2011/40781